# मुंबई विद्यापीठ

मशिमाक/१४/२०२१–२०२२

परिपत्रक :–

विषय:–विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचा–यांची शिफारस करणेबाबत

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर सन २०२०–२०२१ करिता गुणवंत शिक्षकेतर कर्मचा–यांचा विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर निवड करून तसेच विद्यापीठातर्फे निवड होणा–या गुणवंत शिक्षकेतर कर्मचा–यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह तसेच रोख रूपये ५, ०००/ (रूपये पाच हजार फक्त) देऊन गौरविण्यात येईल.

या परिपत्रकाद्धवारे आपणास असे कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या सेवेत नाविण्यपूर्ण कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत काम केलेले आहे अशा शिक्षकेतर कर्मचा–यांचा यथोचित सत्कार २६ जानेवारी, २०२२, रोजी प्रजासत्ताक दिनी करण्याचे ठरविले आहे.

आपणास अशी विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयीन शासनमान्य, अनुदानित विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयातील ज्यांची किमान २० वर्षे सेवा झालेली आहे तसेच ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा एक किंवा दोन पात्र शिक्षकेत्तर कर्मचा–यांचे प्रस्ताव संपूर्ण माहितीसह उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग, २०४, दुसरा मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई– ४०० ०३२ येथे मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत पाठवावेत.

तसेच ज्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नेमणूकीच्या पत्राची प्रत, तसेच अन्य सर्च कागदपत्रांच्या सत्य प्रती तसेच पोलिस अहवाल सहप्रस्तासोबत ३ प्रतित पाठविणे आवश्यक आहे. (तसेच संबधित कर्मचा–यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/ त्यांचा दूरध्वनी कमांक/ महाविद्यालयांचा दूरध्वनी कमांक व घरचा पूर्ण पत्ता) स्वतंत्र पानावर लिहून जोडण्यात यावा.

(श्री. सुधिर पुराणिक )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई– ४०० ३२
१६ नोव्हेंबर, २०२१

प्रति:—

प्राचार्य सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित तसेच शासनमान्य कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये, (उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व जोडपत्र विद्यापीठाने संकेत स्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.)

प्रत माहितीसाठी सादर:—

१) कुलगुरूचे यांचे स्वीय सहाय्यक
२) प्र. कुलगुरूचे यांचे स्वीय सहाय्यक
३) कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक
४) वित व लेखा अधिकारी

# मुंबई विद्यापीठ

सन २०२०–२०२१ करिता गुणवंत पुरस्कार, आपल्या महाविद्यालयातील शिफारस करण्यात येणा–या कर्मचा–यांची खालील माहिती मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभागाकडे सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचा–यांचे संपूर्ण नाव | |
| २. | सेवा पुस्तिका क्रमांक | |
| ३. | कर्मचारी संकेतांक क्रमांक | |
| ४. | महाविद्यालयातील कायमस्वरूपी तत्वावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ५. | सेवेतील कालावधी वर्षे | |
| ६. | हुद्दा | |
| ७. | कार्यालयीन उपस्थिती नियमित / अनियमित | |
| ८. | वर्तणूक | |
| ९. | कार्यालयीन कामकाजातील वक्तशीरपणा | |
| १०. | शिस्तभंगाची कारवाई अथवा ज्ञापन देण्यात आले आहे का? होय / नाही असल्यास त्याबाबतची माहिती | |
| ११. | पोलीस अहवाल | |
| १२. | सेवेत असताना यापूर्वी पारितोषिक / बक्षिस | |
| १३. | प्राचार्य यांची शिफारस महाविद्यालय सेवेत नाविन्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत केलेल्या कामाची सविस्तर माहिती देणे | |
| | | प्राचार्य<br>(महाविद्यालयाचा शिक्का ) |